**शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती**
**राजशिष्टाचार, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
**सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

**विभागाची आवश्यकता:-**

शासनाच्या (मंत्रालयीन विभाग) सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अधिकाऱ्यांची राजशिष्टाचार शाखा, सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विषयांचे विवक्षित कामकाज पार पाडण्याकरिता मंत्रालयातील राजशिष्टाचार उप विभाग येथे, तसेच नवी मुंबई विमानतळावरील नियंत्रण कक्षात विशेष राजशिष्टाचार अधिकारी म्हणून प्रथमत: एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | उप सचिव/अवर सचिव किंवा समकक्ष पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी (मंत्रालयीन राजशिष्टाचार उपविभागाकरिता) | उप सचिव-२<br>अवर सचिव-२ |
| २. | कक्ष अधिकारी पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी (नवी मुंबई विमानतळावरील नियंत्रण कक्षात विशेष राजशिष्टाचार अधिकारी) | कक्ष अधिकारी-२ |

**आवश्यक अर्हता:-**

१) सामान्य प्रशासन विभागांतर्गत राजशिष्टाचार उपविभागाचा विस्तार, सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी या पदनामात बदल तसेच परकीय थेट गुंतवणूक (Foreign Direct Investment), परदेशस्थ नागरिकांचे विषय (Diaspora Affairs) आणि संपर्क (Outreach) अशी तीन स्वतंत्र कार्यासने निर्माण करण्यात आली आहेत. सदर विषयाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे उमेदवारांची पात्रता असणे आवश्यक आहे.

अ) परदेशस्थ नागरिकांचे विषय (Diaspora Affairs):- परदेशात राहणारे भारतीय वंशाचे लोक, अनिवासी भारतीय (NRIs) आणि त्यांच्याशी संबंधित सरकारी धोरणे, कल्याणकारी योजना आणि सांस्कृतिक संबंधाचा विषयाबाबत माहिती व त्याचे ज्ञान आवश्यक आहे.

ब) परकीय थेट गुंतवणूक (Foreign Direct Investment):- अन्य देशातील कपंनीमध्ये गुंतवणूक करणे, नवीन प्रकल्प देशामध्ये निर्माण करणे किंवा अस्तित्वात असलेल्या व्यवसायाचे अधिग्रहण करणे, तंत्रज्ञानाचा विकास करणे या संबंधित विषयाबाबत माहिती व त्याचे ज्ञान आवश्यक आहे.

Mahabharti.in

क) संपर्क (Outreach) :- परदेशात राहणारे भारतीय वंशाचे लोक, अनिवासी भारतीय (NRIs) यांना ते रहात असलेल्या देशात किंवा भारतात आल्यावर येणाऱ्या अडचणी यांबाबत त्यांच्याशी संपर्क साधण्याचा मार्ग निर्माण करणे.

२) उपरोक्त परिच्छेद क्र.१ येथे नमूद केल्यानुसार संबंधित सेवानिवृत्त अधिकारी यांना मराठी व इंग्रजी भोषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच हिंदी व इतर भाषेचे ज्ञान/माहिती असल्यास प्राधान्य देण्यात येईल. तसेच सदर विषयांच्या अनुषंगाने परकीय देशातील दैनंदिन घडामोडींचा अभ्यास असावा. त्याचप्रमाणे नवीन तंत्रज्ञान उदा:- Chat Gpt व Gemni इत्यादी AI tools यांचा वापर करण्याबाबत माहिती असणे आवश्यक आहे.

३) राजशिष्टाचार उप विभागाच्या अंतर्गत नवी मुंबई विमानतळ येथील नियंत्रण कक्ष येथे २४ X ७ शिफ्ट ड्युटीमध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक:-सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का १३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जास्तीत जास्त एक वर्षासाठी करण्यात येणार असून त्याबाबतचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी ही नियुक्ती राहील.

२) विभाग स आवश्यकता असलेली अर्हता धारण करणाऱ्या वय वर्षे ६५ च्या आतील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरीता अर्ज विहित नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावे अथवा टंकलिखित करुन राजशिष्टाचार उपविभागास सादर करावा.

४) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने सदर पदाकरीता दिनांक ११ मे, २०२६ पर्यंत उप सचिव (राजशिष्टाचार), ३ रा मजला, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, या पत्त्यावर पोहोचतील अशा रितीने टपालाने अथवा व्यक्तीश: आणून द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२३१३२ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही, तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

५) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

६) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल व त्याबाबतची नामिकासूची (पॅनेल) तयार केली जाईल. या सूचीतील योग्य उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

Mahabharti.in

७)	करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस राजशिष्टाचार उप विभाग, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथील विवक्षित प्रकारची सर्व कामे करणे बंधनकारक आहे. तसेच कक्ष अधिकारी यांना राजशिष्टाचार उप विभागाच्या अंतर्गत नवी मुंबई विमानतळ येथील नियंत्रण कक्ष येथे काम करावे लागेल. तसेच विभागाच्या आवश्यकतेनुसार प्रसंगानुरुप अन्य ठिकाणी देखील कामकाज हाताळावे लागेल.

८)	राजशिष्टाचार उप विभाग, मंत्रालय, मुंबई व विमानतळ नियंत्रण कक्ष येथील कामकाजाचे स्वरुप व जबाबादारी पहाता, करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी यांनी सदर सेवेचा राजीनामा दयावयाचा असल्यास, त्याबाबत दोन महिन्यांची नोटीस प्रथमत: दयावी.

९)	करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी हे सचिव (राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि संपर्क) व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१०)	सदर नियुक्तीच्या अनुषंगाने पारिश्रामिक व भत्ते आणि इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का १३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

(चंद्रकांत कृ. मोरे)
उप सचिव तथा उपमुख्य राजशिष्टाचार
सामान्य प्रशासन विभाग, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.

Mahabharti.in

# अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज.

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे. |
|---|

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव : ..................................................................

२) अर्जदाराचा पत्ता : ..................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :..................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :..................................................................

५) जन्म दिनांक व वय :..................................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? होय/नाही

७) अनुभव : ..................................................................

विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी करार पध्दतीने नियुक्तीने जाहिरात /सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक:-

अर्जदाराची स्वाक्षरी